**उलटतपास शपथेवर पुन्हा सुरू:-**

मी सभा विरोध करण्यासाठी बोलावली होती. गुरचरण विकु नये म्हणुन आम्ही सभा बोलावली होती. सभेला उपस्थित असलेल्या ५०-६० लोकांपैकी ७ लोकांनी आमच्या दाव्यावर सही केली आहे. सभेतील ४२ ते ४५ लोकांनी आम्हाला विरोध केला हे म्हणणे बरोबर होणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सभा ऑक्टोबर महिन्यात घेतली होती. डिसेंबर २००७ मध्ये आम्ही सभा घेतली होती का हे मला आता आठवत नाही. दत्तात्रय बाळु पाटील हे माझे वडील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझया वडिलांचे नाव सातबारा सदरी पंच म्हणुन होते. दस्ताच्या अनुषंगाने माझया वडिलांना मोबदला मिळाला होता का हे मला माहीत नाही. दत्तात्रय बाळु पाटील यांना एकुण १० वारस आहेत. मी मोह गावात राहतो. सन १९९८ पासुन मी वेगळा राहतो. सन १९९८ पासुन माझया वडिलांचे येणे-जाणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील काय निर्णय घेतात याबाबतची सर्व कल्पना मला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सज्ञान झालेला तरूण वर्ग माझया दाव्याच्या कामी पक्षकार झालेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यातील ७-८ लोकांचे वडील सातबारा सदरी पंच म्हणुन होते. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८७ साली जमीन दिल्यानंतर तिची देखरेख करण्याची जबाबदारी गावकऱ्यांची होती. बक्षीसपत्राच्या मुद्दा क्र.२ मध्ये सर्व्हे क्र.६३ ही जमीन मोह गावाच्या लोकांसाठी दिलेली असल्याने विनामोबदला गावासाठी व गुरांसाठी तिचा वापर करावा असे त्यात नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरहू मिळकतीसंदर्भात वाद निर्माण झाल्यास आम्ही गावकऱ्यांनी तो वाद सोडवावयाचा होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरहू जमीन ओसाड होती, तेथे गुरे चरत होती. माझयाकडे एक गाय होती, ती मेली. दुग्धविकास सहकारी संस्था आमच्या गावची असुन त्यात किती सहकारी होते ते मला आता सांगता येणार नाही. गावात भांडणे झाली, तेव्हा सदर सहकारी संस्था बंद झाली. सदर संस्थेमधुन किती दुध संकलित व्हायचे हे मला सांगता येणार नाही. मी घरगुती म्हशीचे दुध घेतो. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडून गुरांची गणना केली होती का हे

मला माहीत नाही. सातबारा उताऱ्यावर गुरचरण किंवा गायरान असा शेरा नाही, फेरफारवर आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफारवर ही जमीन आम्हाला गुरे चारण्याकरिता दिली असे नमुद आहे. जानेवारी २००७ पासुन दावा मिळकत विक्री करण्याबाबत गावात बोलणी सुरू होती. हे म्हणणे खरे आहे की, सन २००७ ला मिळकतीच्या सातबारा सदरी एकुण २३ लोकांची पंच म्हणुन नावे होती व या २३ लोकांपैकी ५ पंच मयत होते. दिनांक ०९ फेब्रुवारी २००७ ला मिळकत विक्री करण्याकरिता वाजे ग्रामपंचायत येथे ग्रामसभा बोलावली होती हे मला माहीत नाही. या ग्रामसभेत सर्व्हे क्र.६३/० ही मिळकत विक्री करण्याकरिता ठराव करण्यात आला हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याच वेळी जे ५ पंच मयत होते त्यांचे नाव कमी करण्याचा ठराव करण्यात आला. ती जमीन प्रतिवादी क्र.१९ यांनी खरेदी केली त्यावेळेस आमच्या गावातील मंदिराकरिता प्रत्येक व्यक्तीला व सातबारा सदरी असलेल्या पंचांना ठरलेला मोबदला देण्यात आला हे मला माहीत नाही. खरेदीखत लिहुन देणार माझे वडील यांना मोबदला देण्यात आला हे मला माहीत नाही. मोबदला कर्त्या पुरूषांना दिलेला आहे असे मला समजले. दावा दाखल करण्यापुर्वी प्रतिवादी क्र.१९ यांचे खरेदीखत झाले होते. खरेदीखत करण्यापुर्वी आम्ही पेपर नोटीसला हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामसभेत झालेल्या ठरावाप्रमाणे सदरहू मिळकत विक्री केलेली आहे. सदरहू जमीन विक्री करण्याकरिता वाजे ग्रामपंचायत यांनी ना-हरकत पत्र दिले होते हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फेरफारला आम्ही हरकत घेतली होती व त्याची तक्रार तहसिलदार, पनवेल यांच्याकडे सुरू होती. त्यांनी या ठरावाची मुळ प्रत आम्हाला दाखविली होती हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या सातबारा सदरी सन २००८ पासुन प्रतिवादी क्र.१९ यांच्या नावाची नोंद आहे. मी माझया वडिलांना जमीन विक्रीबाबत विचारणा केली होती. पंच लोकांनी किंवा गावकऱ्यांनी प्रतिवादी क्र.१९ यांच्याविरूध्द फसवणुक केल्याबाबत कुठलीही फौजदारी कारवाई केली नाही. माझे व माझया वडिलांचे भांडण नव्हते. वडिलांनी घेतलेला हा

निर्णय मला मान्य नव्हता. आजमितीस आमच्या गावात एकुण १००० ते १२०० गुरे आहेत. आमच्या गावात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी गणना केली त्यावेळेस ३०० ते ३५० गुरे गावात असल्याचा अहवाल दिला होती. काही गुरांची नोंद केली जात नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गावात किंवा पनवेल परिसरात दुग्ध व्यवसाय अस्तित्वात राहिलेला नाही. आमच्या गावातील जमीन मिळकतीसंदर्भात गावातील लोकांनी घेतलेला निर्णय आमच्यासारख्या ४-५ लोकांना मान्य नसल्याने आम्ही ठराव केला. माझया व्यतिरिक्त इतर वादींच्या कुटूंबात देखील जमीन विक्रीचा मोबदला मिळालेला आहे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गावकऱ्यांनी ग्रामसभेत ठराव करून जमीन विक्री केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गावामध्ये कुठलीही दुग्धविकास सहकारी संस्था नाही व गावात गुरे-ढोरे चरत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकत शासनाकडून आलेली नसताना तिला आम्ही गुरचरण संबोधले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गावकऱ्यांनी घेतलेल्या निर्णयाला विरोध करण्याकरिता आम्ही म्हात्रे वकीलांमार्फत खोटी नोटीस दिली. हे म्हणणे खरे नाही की, जमीन विक्री करण्याकरिता शासनाच्या परवानगीची गरज नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी ३० डिसेंबर २००७ ला सभा बोलावल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन प्रतिवादी क्र.१९ च्या मालकीची असल्याने त्यांच्याकडून पैसे उकळण्याकरिता आम्ही खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गावाचे हित बघत असल्याबाबत कुठलाही पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादींच्या विरोधात दावा दाखल करण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कुटूंबाने मोबदला स्वीकारून जास्तीत जास्त मोबदला मिळविण्याकरिता खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१९ यांनी केलेले खरेदीखत कायदेशीर मार्गाचा अवलंब करून केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरहू खरेदीखत रद्द करून मागण्याचा आम्हाला अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र.२० तर्फे**

**प्रतिवादी क्र.२० व त्यांचे वि. अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर.**

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

समक्ष

सही/-
**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल

पनवेल
दिनांक : २३/१२/२०२५.